# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक ०९/०२/२०१८

## *माओवादयांच्या तांत्रिक विभागाचा प्रमुख रामण्णा गडचिरोली पोलीसांच्या ताब्यात*

गडचिरोली पोलीसांनी माओवादयांच्या तांत्रिक विभागाचा प्रमुख रामण्णा ऊर्फ श्रीनिवास विठ्ठलअण्णा मडरू वय- अंदाजे ६५ वर्ष मुळ गाव रा. सिंकदराबाद यास त्याची पत्नी पद्मा ऊर्फ समाक्का ऊर्फ मयुरी ऊर्फ लता ऊर्फ मिनती डोबय्या कोडापे वय- ५५ वर्ष रा. मांड्रा ता. अहेरी जि. गडचिरोली यांना आज अटक केली.

गडचिरोली पोलीसांना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे रामण्णा व त्याची पत्नी पद्मा हे चंद्रपुर मधील बल्लारशहा परिसरात असल्याने सदरची माहिती चंद्रपुर पोलीसांना देण्यात आली होती. त्यावर चंद्रपुर पोलीसांनी सापळा रचत बल्लारशहा येथून दोन्हीही संशयितांना ताब्यात घेतले व गडचिरोली पोलीसांकडे सुपुर्त केले.

रामण्णा या टोपण नावाने माओवादयांमध्ये परिचीत असलेला श्रीनिवास मडरू हा माओवादी म्हणून १९७६-७७ पासून कार्यरत असून त्यावेळी त्याच्याकडे जनसंघटनचे काम सोपविले गेले होते. यानंतर १९९५ पासून त्याच्याकडे तांत्रिक विभागाचे काम देण्यात आले होते. वरिष्ठ माओवादयांनी कालांतराने त्याच्याकडे तांत्रिक विभागाचा प्रमुख म्हणून जबाबदारी दिलेली होती तसेच तो दंडकारण्य स्पेशल झोनल कमेटी मेंबर म्हणून कार्यरत होता. मार्च-१९९६ मध्ये पोलीस व माओवादी यांच्यात झालेल्या चकमकीत त्याचा सहभाग होता. त्यावेळी तो तांडादलममध्ये कार्यरत होता. यानंतर तो कोंडागाव दलम, माड दलम, टिपागड, अहेरी, बस्तर जंगल परिसरातील दलम यामध्ये देखील कार्यरत

होता. माओवादयांसाठी रायफल बनविणे व रायफल चालविण्याचे प्रशिक्षण माओवादयांना देणे ही महत्वाची कामे तो करत होता. शासनाने त्याचेवर एकुण रूपये २५ लाखाचे बक्षीस जाहीर केले होते.

त्याची पत्नी पद्मा कोडापे ही सन-१९९२ मध्ये टिपागड दलममध्ये कार्यरत असताना धानोरा तालुक्यातील चकमक, २२ मार्च १९९६ रोजी डेरीमुरम चकमक (बालाघाट जंगल परिसर), २२ एप्रिल १९९६ रोजी मौजा सिंदेगांव चकमक (बालाघाट जंगल परिसर), सन-१९९८-९९ मौजा सिरीवेरा चकमक (बस्तर जंगल परिसर) यामध्ये तिचा सहभाग होता. तिचेवर सरकारने एकुण रूपये ६ लाखाचे बक्षीस जाहीर केले होते. त्यांच्या चौकशीतून अनेक महत्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे.



